"भारताचे नविन आर्थिक धोरण व केंद्र - राज्य संबंधाचे बदलते स्वरूप"
(विशेष संदर्भ - 1991 ते 2020)

प्रस्तावना/ पार्श्वभूमी : -

भारताच्या आर्थिक व्यवहारांचा इतिहास प्राचीन काळापासून दिसून येतो, वस्तुविनिमय यापासून ते आजच्या डिजिटल ऑनलाइन आर्थिक व्यवहारांत पर्यंत अनेक परिवर्तन झाले. कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' या प्रसिद्ध ग्रंथात राज्यव्यवस्थेच्या कार्यप्रणाली तसेच आर्थिक बाबींचा ही वर्णन दिसून येते नंतरच्या काळात जशी प्रगती, नवनवीन शोध लागले तर राजकीय व आर्थिक संबंध सुद्धा नवीन जगाशी जोडत गेले. भारतावर अनेक परकीय सत्तांनी वर्चस्व गाजवले परंतु दीर्घकाळ टिकून राहणे म्हणजे ब्रिटिश साम्राज्य ब्रिटिशांच्या काळात भारतात अनेक कायदे नियम निर्माण करण्यात आले, ब्रिटिशांनी भारतात विकेंद्रीकरण करण्यात सुरुवात केली व त्यामुळे संस्थानिक राजे महाराजे यांचे क्षेत्र नंतरच्या काळात राज्य व संस्थान म्हणून उदयास आली.केंद्रीय सरकार मजबूत करून राज्यांवर संस्थानावर मजबूत पकड निर्माण केली, त्यामुळे राज्यांना केंद्र संघीय सरकारवर अवलंबून राहण्याची गरज होती.

ब्रिटिश कालीन कायदे, विविध संसदीय कायदे, ब्रिटिश संसदेचे नियम, भारत सरकार कायदा 1909, भारत सरकार कायदा 1919, भारत सरकार कायदा 1935 अशा विविध कायद्यामुळे ब्रिटिशांनी केंद्र राज्य म्हणजे संस्थानिकांना त्यांच्या अधिकार उत्तरदायित्व कर्तव्य इत्यादीत स्पष्ट विभागणी करून शक्ती विभक्तीकरणाचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या काळात भारतीय संस्थानिकांनी स्वतःच्या अधिकार क्षेत्रात वाढ करण्यासाठी वेळोवेळी ब्रिटिश सरकारांना धारेवर धरले, जागतिक दबावामुळे व राष्ट्रीय स्वतंत्र चळवळीमुळे ब्रिटिशांना संस्थानिकांचे अधिकार काही प्रमाणात वाढवावे लागले. या सर्व गोष्टीला अनुसरुन पुढे केंद्र-राज्य मध्ये वेगवेगळ्या प्रकारचे संबंध प्रस्थापित झाले. राज्यांना संघीय व्यवस्थेच्या चौकटीत राहूनच आपापल्या क्षेत्रात व्यवस्था निर्माण करण्याचा ओढ वाढू लागला, विशेषता भारत सरकार कायदा 1935 हा मोलाचा ठरला, व यात केंद्र राज्य मामल यावर प्रकाश टाकून ते अधोरेखित करण्यात

आले भारत स्वातंर्त्यनंतर घटनाकारांनी घटक राज्याचे अधिकार, कार्य, कर्तव्य तेथील सरकार इत्यादी अनेक बाबी स्पष्ट नमूद केल्या. भारताने संघीय व्यवस्था स्वीकारली व सर्व घटक राज्य केंद्राच्या छताखाली आली. नंतरच्या काळात घटनेने दिलेल्या अधिकारानुसार केंद्र-राज्य संबंध सुरुवात झाली. भारतीय राज्यघटना संघराज्य स्वरूपाची असल्यामुळे सर्व अधिकार केंद्र राज्यांत विभागलेली आहेत परंतु केंद्रीय कायदे व राज्य कायदे यांची अंमलबजावणी करण्यासाठी घटनेत एकात्मिक न्यायव्यवस्था स्थापन केल्याने न्यायिक अधिकारांची विभागणी केलेली नाही.

भारताचे वर्णन राज्यांचे संघराज्य असे करत असले तरीही राज्यघटना देशातील संघीय व्यवस्था प्रदान करते या शब्दाचा अर्थ असा होतो की, प्रथम भारतीय महासंघ स्वातंर्त्य घटकांमधील कराराचा परिणाम नाही आणि दुसरे म्हणजे भारतीय संघ युनिट्स फेडरेशन सोडू शकत नाही. भारता राज्याचा संग आहे, भारताच्या राज्यघटनेने केंद्र आणि राज्य मधील वित्तीय, कार्यकारी आणि आर्थिक अधिकारांची विभागणी केली आहे, ज्यामुळे राज्यघटनेला एक संघराज्य वर्ण मिळतो तर न्याय पालिका एका श्रेणीबद्ध संरचनेत समाकलित आहे. जरी आपापल्या अधिकार क्षेत्रात केंद्र व राज्य सर्वोच्च असली तरी संघराज्य प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात उत्कृष्ट समन्वय व सामंजस्य आवश्यक आहे. त्यामुळे केंद्र-राज्य यांच्यातील संबंधाचा विविध पैलूंचे नियमन करण्यासाठी राज्यघटनेत तपशीलवार तरतुदी करण्यात आल्या आहेत.

केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध खालील प्रमाणे विभागलेले आहेत.

1. केंद्र -राज्य कायदेशीर संबंध
2. केंद्र राज्य प्रशासकीय संबंध
3. केंद्र व राज्य आर्थिक संबंध

वरील तीनही केंद्र-राज्य संबंधांना भारतीय राज्यघटनेत स्थान दिले आहे.

नंतरच्या काळात जेव्हा केंद्र-राज्य संबंधाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्यास सुरुवात झाली. तेव्हा केंद्र-राज्य संबंध विवादात्मक व संघर्षात्मक रूप घेऊ लागली. त्यात प्रामुख्याने राज्यपालांचे पद नोकरशाहीची भूमिका भाषा विभाग राज्य सूची वर केंद्राच्या हस्तक्षेप, अनुदान व

स्वायत्ततेची मागणी इत्यादी प्रकारच्या अनेक कारणांवरून केंद्र-राज्य संबंध बिघडण्याची अनेक उदाहरणे समोर येऊ लागली. त्यामुळे काळाच्या ओघात केंद्र-राज्य संबंध सतत बदलत गेली.

केंद्र-राज्य संबंधी सुधार व सामंजस्य राहावं यासाठी केंद्र सरकारने अनेक समित्या, आयोग नेमल्या त्यात प्रामुख्याने सरकारिया आयोग व एम एम पुंची आयोग यांनी केंद्र-राज्य संबंधाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला, तसेच प्रशासकीय सुधारणा आयोग, वित्त आयोग, नियोजन आयोग वर्तमान काळातील निती आयोग यांनीसुद्धा केंद्र-राज्य संबंध आता महत्त्वाची भूमिका बजावली. परंतु संघीय सरकारने आपली एकतर्फी वर्चस्व गाजवणे करिता वरील बाबींना दुर्लक्षित केलेले आढळून येते.

उत्तर आधुनिक काळात आर्थिक बाबींना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. व आर्थिक मंदीच्या समस्येतून सुटण्यासाठी जगाने नवीन आर्थिक सुधारणा कडे आपले लक्ष्य केंद्रित केले, त्यात भारताने सुद्धा उडी घेतली. प्रसिद्ध अर्थतज्ञ व माजी पंतप्रधान डॉक्टर मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली भारताने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. 1991 मध्ये सुरु करण्यात आलेल्या आर्थिक सुधारणा प्रामुख्याने भारताच्या अर्थव्यवस्थेला बाजारी प्रमुख खुल्या अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्यासाठी तयार करण्यात आल्या होत्या, आर्थिक बदलानंतर केंद्र राज्य सरकारांच्या संबंधित भूमिकाची नवीन लाट आलेली दिसून येते. गुंतवणुकीच्या स्थानावरील नियंत्रणाचे उदारीकरण केल्याने उपराष्ट्रीय प्रदेशात प्रादेशिक सरकार एकमेकांना मागे टाकण्यासाठी अधिक थेट स्पर्धा निर्माण करते, राज्यांसाठी धोरणाची जागा खुली करण्यापलीकडे लवकरच हे स्पष्ट झाले की आर्थिक सुधारणांच्या एजंट यासह पुढे जाण्यासाठी राज्य सरकार यांचे सहकार्य वाढवणे आवश्यक आहे सुरुवातीपासूनच केंद्र सरकारने सुधारणांच्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्यांना सोपवलेली आहे.

90 च्या नंतरच्या भारतात विविध प्रकारच्या सुधारणा करण्यात आल्या, त्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे केंद्र-राज्य संबंधावर झालेला प्रभाव सदरील शोधात घेण्यात येईल. अलीकडील काळातील जीएसटी लागू करणे त्यांच्यामुळे केंद्र-राज्य संबंधावरील वित्तीय संबंधात अनेक

परिवर्तन घडून आले, त्यांच्यामुळे राज्यांचे उत्तरदायित्व कशाप्रकारे वाढले व राज्यांना मिळणारा केंद्राकडून निधी करांचा हिस्सा इत्यादी बाबीवर परिणाम झालेला आहे.

भारतीय राज्यघटनेने राजकोषीय संघराज्य संबंधाची कल्पना केली आहे, ज्याचे अनेकांनी केंद्र भिमुख वर्णन केले वित्त आयोगासारख्या यंत्रणेद्वारे विशेषता वित्त आयोगाच्या एवजी संसाधनाची विभागणी सूत्रांच्या एका संचाचा आधारे होणार होती, जी राज्यांना घटनेने त्यांच्या वाटप केलेल्या खर्चाच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास सक्षम करेल केंद्र आपल्यावरती खर्चाचे वित्त पुरवठा सुरू ठेवण्यासाठी कर्ज घेत आहे, व या खर्चाचे स्वरूप केंद्रीय योजनांना जास्त कर्ज देत आहे, तर चौदाव्या वित्त आयोगाने केंद्राच्या राज्यांवर अतिक्रमण करण्याचा हा दीर्घकालीन प्रवृत्ती ओळखून उभ्या हस्तांतरणाच्या 32 टक्के यावरून 42 टक्के पर्यंत यापर्यंत विस्तार करून यावर पुन्हा उपाय करण्याचा प्रयत्न केला जेणेकरून राज्यांना अखंडित पैसा पुरविला जाईल.

असे अनेक विविध पैलू आहेत की ज्यांचा केंद्र-राज्य संबंधावर दीर्घकालीन परिणाम झाला. नव्वदच्या दशकानंतर असे अनेक आर्थिक सामाजिक कायदेशीर प्रशासकीय घटना घडल्या यामुळे केंद्र-राज्य संबंध काळाच्या ओघात बदलत गेले विशेष करून भारतीय राज्यघटनेतील कलम 280 नुसार दर पाच वर्षांनी राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करतात. त्याची भूमिका केंद्र-राज्य संबंधाबाबत 90 च्या शतकानंतर कशाप्रकारे बदलेली आणि 90 च्या नंतर ची विविध आयोग, समित्या, आंतरराष्ट्रीय घटना राज्यांना मिळालेले काही प्रमाणातील आर्थिक स्वायत्तता केंद्र राज्यातील असतील सरकार राजकीय भूमिका तसेच वेगवेगळे कायदे, घटनादुरुस्त्या यांचा प्रभाव केंद्र-राज्य संबंधावर पडलेला दिसून येते.

'नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार व केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप' हा विषय वरील विवेचनात स्पष्ट करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे व केंद्र-राज्य संबंध सतत वादाच्या वजनात मुद्दा बनलेला असतो, त्यावर प्रकाश टाकण्यासाठी सदरील प्रस्तुत संशोधन विषय निवडलेला आहे.

अभ्यास विषयाची निवड : -

भारतीय संघराज्य व्यवस्थेत घटक राज्य ही केंद्राच्या आधीन आहेत. भारतीय घटनेत केंद्र-राज्य संबंधाविषयी तरतुदी करण्यात आलेले आहेत, परंतु हा विषय सतत विवादास्पद ठरत असतो परंतु कालांतराने भारतात विविध क्षेत्रात सुधारणा होत गेल्या, त्यातील महत्त्वाची म्हणजे 90 व्या शतकानंतर च्या आर्थिक सुधारणा प्रशासकीय कायदेशीर तसेच केंद्र राज्य संबंधातील संबंधित विविध सुधारणा यामुळे केंद्र राज्य संबंधात सकारात्मक बदल घडून आला. त्यादृष्टीने सदरील संशोधन कार्यात 1991 च्या नंतर च्या कालखंडातील झालेल्या केंद्र राज्य वित्तीय, कायदेशीर व प्रशासकीय बाबींचा आढावा घेणे काळाची गरज आहे.

राज्यांना आपली आर्थिक पंखे पसरविण्यास मदत झाली. परकीय गुंतवणूक, बाजाराचे स्पर्धात्मक रूप, व्यापार, विनिमय, परवाने, नियंत्रण इत्यादी अनेक बाबी राज यांच्या बाबतीत शिथिल करण्यात आल्या, जेणेकरून राज्यांचे संबंध जागतिकीकरणाची जोडले व राज्यांना काही प्रमाणात आर्थिक स्वायत्तता उपलब्ध करून देण्यात आली. त्यादृष्टीने हा विषय संशोधन योग्य ठरतो.

संशोधनाची उद्दिष्टे : -

1. नवीन आर्थिक धोरणेत्तर काळातील केंद्र - राज्य संबंधातील बदलत्या आयामांचा अभ्यास करणे.
2. 1991 नंतरच्या केंद्र-राज्य संदर्भात वित्त आयोगाच्या या भूमिकेचा आढावा घेणे.
3. समकालीन विविध आयोग, समित्या, अहवाल इत्यादींचा केंद्र राज्य संबंधावरील प्रभावांचा प्राथमिक अभ्यास करणे.
4. नवीन आर्थिक सुधारणेत घटक राज्यांच्या योगदानाचे विश्लेषण करणे.
5. नवीन आर्थिक धोरण व केंद्र - राज्य संबंधाशी निगडित विविध पैलूंचा अभ्यास करणे.
6. केंद्र-राज्य संबंधाचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये : -

1. नवीन आर्थिक धोरणानंतर केंद्र - राज्य संबंधात परिवर्तन घडून आले.
2. नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्याने 1991 नंतरच्या वित्त आयोगाची भूमिका बदलली.
3. नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकारानंतर घटक राज्य आंतरराष्ट्रीय राजकारणाशी जोडली गेली.
4. केंद्र - राज्य संबंधात सामंजस्य निर्माण झाले.
5. घटक राज्यांना आपली आर्थिक प्रगती साधण्याचा चालना मिळाली.
6. केंद्र - राज्य संबंधाच्या निगडित विविध बाबींना महत्त्व प्राप्त झाले.

पूर्व संशोधनाचा आढावा : -

संशोधन करण्याचे निश्चित झाल्यानंतर "नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार व केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप" या विषयाशी निगडित संशोधकांनी केलेले कार्य संबंधित ग्रंथ, पत्रिका, अहवाल, समित्या इत्यादी साहित्यांचे अवलोकन केले असता पुढील प्रकारचे लिखाण या विषयाच्या संदर्भात झालेले दिसून येते, सदरील विषयासंदर्भात जास्त संशोधन लिखाण नसल्यामुळे त्यासंबंधी निगडित काही विषयाच्या अनुषंगाने काही आढावा पुढील प्रमाणे मांडण्यात आला आहे.

1. घटनातज्ञ डॉ. नाना पालखीवाला यांनी 'वि द पीपल' हा ग्रंथ लिहिला, त्यात त्यांनी भारतीय राजकारण भारतीय राज्यव्यवस्थेतील अनेक बाबींवर प्रकाश टाकला. या ग्रंथात मुख्यत्वे केंद्र राज्य संबंध केंद्र राज्य संबंधातील संघर्षाची राजकारण तसेच केंद्र राज्य संबंधित अनेक पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यातून संशोधकाला संशोधनातील समस्या मांडण्यासाठी मदत झालेली आहे.

2. वीरेंद्र ग्रोवर यांनी 'Federal system Central - State Relations In India' या नावाने ग्रंथ लिहिला, त्यात केंद्र राज्य संबंधित विवादित गोष्टींचा समावेश तसेच राज्य स्वायत्तता विषयी मांडणी करण्यात आली, याचा फायदा संशोधकांसाठी नक्की होईल.

3. असिमा सिन्हा यांनी जानेवारी 2004 'Changing Political Economy Of Federelism In India' हा लेख प्रकाशित केला त्यात त्यांनी विकेंद्रीकरण आणि उद्योग शक्ती मध्ये उपराष्ट्रपती विश्लेषण अधोरेखित केले यात त्यांनी 1991 च्या नंतर चे भारताचे आर्थिक सुधार व केंद्र राज्य संबंध यावर प्रकाश टाकला सदरील लेख संशोधनाच्या दृष्टीकोनातून खूपच लाभदायक ठरतो.

4. बलदेव राज नायर यांनी 'Political Structure and Indian Economic Reforms of the 1990's' नावाने 1998 वर्षी पेपर प्रकाशित केला यात त्यांनी 90 च्या दशकातील भारतातील आर्थिक सुधारणांचे विवेचन करीत भारतीय राजकीय संरचना कशा प्रकारे परिवर्तन झाले याचे प्रतिपादन केले आहे यातून आपल्या संशोधन कार्यास वाटचाल मिळाली.

5. डॉ अनुपम अग्रवाल शरद अग्रवाल यांनी 'भारतीय अर्थव्यवस्था का विकास' या नावाने हिंदीत ग्रंथ प्रकाशित केला, यात भारताच्या आर्थिक व्यवस्थेच्या ब्रिटिशकाळापासून चा अभ्यास आहे. सोबतच बदललेल्या आर्थिक धोरणे सुधारणा विविध बदलेले दृष्टीकोण यांचा सुद्धा प्राथमिक अभ्यास केलेला आहे. याचा आपणास संशोधनास योग्य मार्ग दाखवण्यास योग्य ठरले.

6. ठाकूर रामानंद यांनी 'Finance Commission and Central State Relation In Indian' हा ग्रंथ अंडी पब्लिकेशन द्वारा दिल्लीत 1998 वर्षी प्रकाशित केला, यात त्यांनी केंद्र राज्य वित्तीय संबंधाचे धागेदोरे कशाप्रकारे गुंतलेले आहे व त्याचा प्रभाव घटक राज्य व कशा प्रकारे पडत आहे, तसेच भारतातील वित्त आयोग भुमिता केंद्र राज्य संबंधाच्या पार्श्वभूमीवर कशा प्रकारे कार्य करते या संबंधित सखोल लिखाण केले आहे.

7. पंचमुखी पी.आर. यांनी 'Public Financing Of Social Sector : Before And After Economic Reform' 1992 या ग्रंथात नवीन आर्थिक धोरण यानंतरचे भारताचे सामाजिक क्षेत्रातील सार्वजनिक वित्त त्यांचा प्रभाव व त्यास कारणीभूत प्रभावित करणारे घटकांचे पूर्वीचे वसुधा नंतरचे गुणात्मक संख्यात्मक विवेचन या ग्रंथात केले आहे.

8. 2009 वर्षी प्रजापति मुग्धा यांनी 'भारत में केंद्र राज्य वित्तीय संबंध 11 वे एंव 12 वे वित्त आयोग के संदर्भ मे एक अध्ययन' या शीर्षकावर डॉक्टर गुप्त शिवनारायण यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्वांचल विद्यापीठात पीएच.डी प्रबंध सादर केला. यात त्यांनी भारतीय संघ वित्त व्यवस्था भारताच्या वित्त आयोगाच्या शिफारशी भारतातील केंद्र राज्य वित्तीय संबंध तसेच योजना आयोगाची भूमिका भारतातील केंद्र राज्य संबंधित समस्या व त्यांचे उपाय योजना इत्यादीचे विवेचन केले आहे.

9. 2013 वर्षी भास्कर यांनी 'ऑप्शन्स फोर गुड्स अंड सर्विस टॅक्स स्ट्रक्चर रेफरन्स इंडिया' या शिक्षकांवर शर्मा जेबीएम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठात पदवी करिता शोधप्रबंध सादर केला. या प्रबंधात त्यांनी भारतीय करण्याची उत्क्रांती जीएसटी संबंधित जागतिक बाबी सार्वजनिक वित्त जीएसटी जीएसटी प्रणाली अमलात आणण्यासाठी कायदेशीर बाबी अशा महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकला.

10. प्रथम प्रशासकीय सुधारणा आयोगाने 'Repot On The Study Team On Central - State Relationship' Volume l नावाने 1967 रोजी सदरील रिपोर्ट प्रकाशित केली. यामध्ये मुख्य मुद्दा विशेषता केंद्र-राज्य संबंधावर जोडला गेलेला आढळतो या केंद्राचे वित्तीय कायदेशीर प्रशासकीय व इतर तत्कालीन अनेक संदर्भातील मुद्द्यांवर प्रकाश टाकला गेला हा अहवाल संशोधन कार्यासाठी अत्यंत लाभदायक ठरतो.

संशोधन पद्धती : -

प्रस्तुत संशोधन विषयात अध्ययनासाठी माहितीचा स्रोत हा दुय्यम साधने हा असून, हा अभ्यास प्रामुख्याने ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक इत्यादी स्वरूपाचा आहे. 'नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार व केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप' या विषयाचा अभ्यास करताना कोणत्याही विशिष्ट अशा पद्धतीचा वापर आवश्यकतेनुसार करण्यात.

तथ्य संकलन : -

सामाजिक शास्त्रात तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात त्यामध्ये प्राथमिक साधने व दुय्यम साधने ही आहेत, प्रस्तुत सदरील संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सूत्राचा वापर केला जाईल.

प्राथमिक साधने : -

विषयाशी निगडित आवश्यकतेनुसार प्राथमिक साधन स्रोतांचा विचार केला जाईल, जास्त भर दुय्यम साधनावर देण्यात येईल.

दुय्यम साधने : -

प्रस्तुत विषयाशी निगडित पत्र, पुस्तके, वर्तमानपत्रे, बातम्या, संदर्भग्रंथ, संशोधनपर लेख, संशोधन प्रबंध, मासिके, पाक्षिक, शासनाचे विविध समित्या, आयोगांच्या शिफारशी, इंटरनेट, ग्रंथालय व विषयाशी संबंधीत साहित्य, सामग्री इत्यादी साधनांचा विचार करण्यात येईल.

संशोधनाची मर्यादा व व्याप्ती : -

प्रस्तुत या संशोधनासाठी निवडलेला विषय 'नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार व केंद्र-राज्य संबंधाचे बदलते स्वरूप' (विशेष संदर्भ 1991 ते 2020) या संशोधनाचे कार्य करीत असताना, नवीन औद्योगिक धोरणाचे स्वरूप तसेच केंद्र-राज्य संबंधाचे चे राज्यघटनेतील स्थान व समकालीन बदल 90 च्या दशकातील आर्थिक सुधारणा व त्यानंतर च्या काळातील झालेले नवीन कायदे, नियम, वेगवेगळ्या समित्या, आयोगाचा अभ्यास तसेच केंद्र राज्य वित्तीय संबंधाचा झालेला, बदलांचा अभ्यास सदरील संशोधन विषयात केला जाईल. सोबतच 90 व्या शतकात नंतरच्या काळात वित्त आयोगाची भूमिका काय होती. केंद्र-राज्य संबंधावरील आणि राज्यांना मिळणारा वाटा कररचना इत्यादी बाबींना विचारात घेण्यात येतील आर्थिक सुधारणा दरम्यान काही कायदे, घटना दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यांचा केंद्र-राज्य संबंधावरील परिणामांचा तसेच सरकारीया आयोग व पुंची आयोगाच्या मुख्य शिफारशी वरील प्रकाश टाकण्यात येईल, अलीकडील काळातील जीएसटीमुळे केंद्र-राज्य संबंध प्रभावित झाले त्याचा प्राथमिक आढावा सुद्धा सदर संशोधनाचा

वाक्यात घेतला आहे. तसेच भारतीय राज्यघटनेतील केंद्र-राज्य संबंधाशी निगडित बदलांचा आढावा घेण्यात येईल. विशेष करून 90 च्या नंतर ची केंद्र राज्य वित्तीय संबंध व वित्त आयोगाची भूमिका यावर आर्थिक सुधारणा मुळे काय परिणाम झाले, याचा विश्लेषणात्मक आढावा घेण्यात येईल त्याचप्रमाणे घटक राज्यांनी जगातील इतर देशांशी उद्योगाच्या व आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून कशा प्रकारे संबंध प्रस्थापित केले व त्यांची आर्थिक प्रगती, घटक राज्य आणि देशाच्या आर्थिक विकासासाठी केलेले योगदान इत्यादी विविध विविध गोष्टीचे अध्ययन यात करण्यात येईल. सदरील विषयाशी संबंधीत कालावधी हा 2022 ते 2026 या दरम्यान संशोधन कार्य केले जाईल.

एकंदरीत सदरील संशोधनातील मर्यादा या 90 व्या शतकात नंतरच्या आर्थिक सुधारणे तर केंद्र राज्य वित्तीय संबंधावरील पैलूवर काष्टा करण्यात येईल. सोबतच आर्थिक वाढीची सुधारणा व राज्याच्या आर्थिक कामगिरीच्या नमुन्यात संबंधी प्रमुख वादविवादाच्या थोडक्यात आढावा घेण्यात येईल, याप्रमाणे प्रस्तुत संशोधन कार्याचा कालखंड निश्चित करताना 1991 ते 2020 या वर्षातील केंद्र-राज्य संबंधित विविध पैलूंचा प्राथमिक अभ्यास केला जाईल. अर्थ संकल्पातील तरतूदी व राज्यांच्या पायाभूत सुविधा, संसाधन उपलब्धता, राज्यांचा वाटा इत्यादी. वरील स्वरूपाच्या मर्यादा आणि संशोधन कार्याशी संबंधित व्याप्ती वरील प्रमाणे विवेचनात घेण्यात येईल.

संशोधनाचे महत्त्व : -

प्रस्तुत संशोधनात केंद्र-राज्य संबंधावरील अलीकडील काळातील आर्थिक सुधारणा करण्यात आल्या त्यात मुख्यत्वे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण साठी भारताने आपले द्वार उघडले, त्यामुळे केंद्र-राज्य संबंध प्रभावित झाले, त्यांचा विश्लेषण घेणे काळाची गरज भासत आहे त्या दृष्टिकोनातून प्रस्तुत विषयाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीस अनेक आर्थिक समस्यांना सामना भारताला करावा लागला भारताने एक संरचनात्मक समायोजना कार्यक्रम स्वीकारला आणि देशाला हळूहळू आर्थिक सुधारणांच्या मार्गावर नेले,

एकंदरीत सांगायचे म्हटले तर भारत समाजवादी दृष्टिकोणापासून भांडवल शाही दृष्टिकोणाकडे अप्रत्यक्षपणे वाटचाल करण्यास सुरुवात केली.

स्थूल आर्थिक वातावरण पण आणि व्यापार गुंतवणूक व्यवस्था सुधारण्या व्यक्ती रीत आर्थिक सुधारणांनी भारताच्या संघीय लोकशाही मध्ये कोण बदल घडवून आणले, त्यांची राज्य सरकारसाठी ची धोरण बनवण्याची मोठे स्थान आणि त्यांच्या स्वतःच्या आर्थिक जबाबदारी संदर्भात उत्तरदायित्व वाढ झाली राज्यांचे नियंत्रण कमी झाल्याने राज्यांनी औद्योगिक गुंतवणूक व इतर आर्थिक क्षेत्रात रस दाखवला व स्वतःची औद्योगिक धोरणे मांडली. एकत्रितपणे परिवर्तनाचा मुळे आर्थिक प्रश्न या सणाची एक विशेष पुनर्रचना झाली त्यामुळे केंद्र राज्य संबंध हा विषय खूप महत्त्वाचा बनला, अलीकडच्या काळात राज्य स्वयंपूर्ण बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागली. भारतीय संघीय व्यवस्थेच्या इतिहासात केंद्र-राज्य संबंध सुरुवातीपासूनच वादग्रस्त आणि ज्वलंत विषय ठरतो.

भारतीय राज्यघटनेत केंद्र-राज्य संबंधाचे स्पष्टपणे विवेचन केले, तरीसुद्धा केंद्र सरकार कडे झुकते माप दंड देण्यात आले. त्याचा केंद्रीय सरकार व राजकीय पक्ष स्वतःच्या फायद्यासाठी राजांवर अमोल करताना दिसून येते. 1967 च्या नंतर च्या काळात घटक राज्यांनी स्वायत्ततेसाठी संघर्ष सुरू केले, पश्चिम बंगाल तमिळनाडू, पंजाब व इतर ईशान्येकडील राज्यांनी त्यांच्या अधिकारात वाढ करण्यासाठी संघर्ष सुरू केले, व पुढील काळात केंद्र-राज्य संबंध हे तणावाचे वळण घेऊ लागले.भारतीय घटक राज्यांकडे खूप कमी प्रमाणात अधिकार असल्याने त्यांना स्वतःचा विकास व स्वयंपूर्ण होण्यासाठी खूप कमी संधी आहे, परंतु उत्तर आधुनिक काळात आर्थिक विकास महत्त्वाचा ठरू लागला. त्यामुळे भारत सरकारने 1991 ला जगासाठी आपले द्वार उघडले व आर्थिक विकासास चालना देण्यासाठी केंद्र राज्यांना प्रोत्साहित करण्यात आले, त्यामुळे नियोजन आयोग वित्त भारतीय विकास परिषद व केंद्र राज्य वित्तीय संबंध यांच्यात परिवर्तन घडून आले, त्यामुळे घटक राज्यांना महत्त्व प्राप्त झाले. अशा रीतीने विविध बाबी झालेले बदल या

दृष्टिकोनातून संशोधन विषय **'भारताचे नवीन आर्थिक धोरण व केंद्र राज्य संबंधाचे बदलते स्वरूप'** अध्ययन विषयाचे महत्त्व आहे.

संशोधन प्रकरण मांडणी : -

प्रस्तुत शोध आराखडा पुढील प्रमाणे सात प्रकरणात वर्गीकृत करण्यात येणार असून त्याची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणाची मांडणी करताना संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधनाची उद्दिष्टे, पूर्व संशोधन आढावा, गृहीतकृत्ये, संशोधनाचे महत्त्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा व संशोधन पद्धती आणि मुख्य विषयाशी निगडित आवश्यक बाबींचा समावेश करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : नवीन आर्थिक धोरणाची पार्श्वभूमी (1991)

प्रस्तुत प्रकरणात 1991 चे नवीन आर्थिक धोरणाचे स्वरूप व्याप्ती व संबंधित सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करण्यात येईल, पूर्वीचे व नंतर चे आर्थिक धोरण व उपाय योजना महत्त्वाच्या बाबींचा सखोल समावेश करण्यात येईल

प्रकरण तिसरे : केंद्र-राज्य संबंध संविधानिक चौकट

प्रस्तुत प्रकरणात भारतीय राज्यघटनेतील केंद्र-राज्य संबंधाचे स्थान तसेच केंद्र-राज्य कायदेशीर संबंध, प्रशासकीय संबंध आणि आर्थिक संबंधाचा तरतुदीनुसार आढावा घेण्यात येईल, काळानुरुप बदलते नियम, घटना दुरुस्त्या इत्यादींचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे : नवीन आर्थिक धोरणेतर केंद्र-राज्य संबंध

प्रस्तुत प्रकरणात 1991 नंतरच्या काळातील केंद्र-राज्य संबंधाची संबंधित पैलूंचे अध्ययन करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : 1991 नंतरच्या कालखंडातील वित्त आयोगाचे विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणात नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतरचे वित्त आयोगाचे संख्यात्मक विश्लेषण व त्यांच्या शिफारशींचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : केंद्र-राज्य संबंधाचे समकालीन विविध पैलू

प्रस्तुत प्रकरणात केंद्र-राज्य संबंधाशी निगडित वर्तमान काळातील बदलते स्वरूप व काळाच्या ओघात घटक राज्यांचे महत्त्व व या संदर्भातील इतर बाबींचा समावेश करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरण योजना संभाव्य आहे, संशोधन दरम्यान यात आवश्यकतेनुसार बदल संभवतो.

प्रकरण सातवे : समारोप, निष्कर्ष आणि शिफारशी

संदर्भ ग्रंथसूची : -

1. डॉ. सिंग बीरकेस्वर प्रसाद, भारत में राज्यों की राजनीति, ज्ञानदा प्रकाशन, नई दिल्ली, 2008.
2. डॉ.फाडिया बी. एल., भारतीय संघ व्यवस्था एंव केंद्र-राज्य संबंध, कैलास पुस्तक सदन, 2010.
3. डॉ. भोळे भा. ल. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण,पिंपळापुरे अंड पब्लिकेशन नागपूर, 2003.
4. किरण देसले, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग 1,दीपस्तंभ अकॅडमी, पुणे.
5. डॉ. देसाई, डॉ.सौ., भालेराव निर्मला भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, 2014.
6. डॉ. शशि भूषण कुमार, भारतीय संघवाद : केंद्र-राज्य संबंध, जानकी प्रकाशन, पटना, 2009.
7. हरी गोपाल परांजपे, भारत की वित्तीय शासन व्यवस्था, केंद्रीय हिंदी निर्देशालय.
8. Dr. Pal Chandra, Central - State Relations And Co-operative Federalism, deep and deep publication.
9. Verma Meena, Central - State Relation Economic and Political Dimensions.

10. Arora S. C., Current Issues And Trends In Central - State Relationn, Mithal Publications, 1991.
11. Baldev Raj Nayar, Political Structure And Indias Economic Reforms of 1990 - Artical
12. Virendra Grover, Federal System, Central - State Relation And State Atonomy
13. डॉ. अनुपम अग्रवाल, शरद अग्रवाल, भारतीय अर्थव्यवस्था का विकास.
14. प्रेम राज, भारतीय अर्थव्यवस्था के नये आयाम,
15. Hitesh R. Patel, Central - State Relations, JTS Publication, Delhi
16. Himanshu Roy, M. P. Singh, APS Chouhan, State Politics In India, Primus Books, Mukharji Nagar, Delhi
17. एस. पी. एन. चोपड़ा , प्रभा चोपड़ा, आर्थिक एंव विदेश नीति

E - Sourses : -

1. www.infibilient.com
2. www.google.com
3. www.shodhganga.inflibnet.ac.in
4. www.shodhsinghu.com

संशोधक विद्यार्थी

स. रवींद्रसिंघ गुरुमुखसिंघ सपुरे
{M.A.,NET, SET, MANF, (Pol. Science)}
नेताजी सुभाष चंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.

संशोधक मार्गदर्शक,

प्रा. डॉ. एस.बी. फड
{M.A.,NET, Ph. D(Pol. Science}
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
नेताजी सुभाष चंद्र बोस महाविद्यालय, नांदेड.